सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात प्रबोधनकार ठाकरे यांच्या प्रतिमापूजनप्रसंगी डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. डी. टी. शिर्के, प्रा. पी. एस. पाटील, प्रा. डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. प्रकाश पवार, डॉ. भारती पाटील आदी.

# विद्यापीठात प्रबोधनकारांना जयंतीनिनिमित्त अभिवादन

**कोल्हापूर :** केशव सीताराम ऊर्फ प्रबोधनकार ठाकरे यांची जयंती शनिवारी (ता. १७) शिवाजी विद्यापीठात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते केशव सीताराम ऊर्फ प्रबोधनकार ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. या वेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, डॉ. भारती पाटील, राज्यशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार, डॉ. रवींद्र भणगे, उपकुलसचिव डॉ. नीलेश बनसोडे यांच्यासह शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय सेवक, संशोधक विद्यार्थी उपस्थित होते.

1 8 SEP 2022
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सैफ डीएसटी केंद्र वापरकर्त्यांसाठी समर्पित

## सैफ डीएसटीचे समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे : स्तुती उपक्रमांतर्गत पन्हाळा येथे अभ्यास सहल

प्रतिनिधी
कोल्हापूर

नवी दिल्लीतील भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग आणि आय-एसटीईएमच्या पाठिंब्याने सात दिवसाच्या स्तुती प्रशिक्षण उपक्रमाचे आयोजन केले होते. या उपक्रमाचा आज १८ रोजी दुपारी ४ वाजता समारोप होत आहे. कार्यशाळे दरम्यान अनेकांनी या विभागाला भेट दिली. केंद्राच्या कर्मचाऱ्यांसह डॉ. सोनकवडे यांनी केलेल्या प्रयत्नाबद्दल कौतुक केले. शिवाजी विद्यापीठ प्रशासनाच्या मदतीने सैफ-डीएसटी केंद्र देशभरातील वापरकर्त्यांसाठी समर्पित केले आहे, असे प्रतिपादन केंद्राचे समन्वयक डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात स्तुती उपक्रमांतर्गत शैक्षणिक सहलीला गेलेले डॉ. आर. जी. सोनकवडे, विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक.

शिवाजी विद्यापीठात स्तुती अंतर्गत सुरू असलेल्या प्रशिक्षण मार्गदर्शनपर व्याख्यानानंतर सहभागींना पन्हाळ येथे शैक्षणिक सहलीला नेवून परिसराची माहिती दिली. पन्हाळा येथील शिवाजी विद्यापीठाच्या अवकाश संशोधन केंद्राला भेट दिली. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे प्रा. राजाराम माने यांनी 'नॅनोस्ट्रक्चर आणि त्यांचे उपयोग' या विषयावर मार्गदर्शन केले. शिवाजी विद्यापीठाचा माझी शैक्षणिक कारकीर्द घडविण्यात खूप मोलाचा वाटा असल्याचे त्यांनी सांगितले. शिवाजी विद्यापीठाच्या स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजीचे डॉ. टी. डी. डोंगळे यांनी 'मेथडस् अँड प्रोटोकॉल्स फोर द मेजरमेंट ऑफ वोलाटाइल मेमरी अँड सिनेप्टिक लर्निंग प्रॉपर्टीज ऑफ रेसिस्टिव स्वीचींग डीव्हाईसेस' या विषयावर मार्गदर्शन केले. पुणे येथील नॅशनल केमिकल लॅबोरेटरी संस्थेचे, शास्त्रज्ञ डॉ. सी. एस. गोपीनाथ, डॉ. के. सिल्वराज यांच्यासह प्राध्यापक, संशोधक विद्वानांनी केंद्रातील अत्याधुनिक उपकरण आणि सुविधांचे कौतुक केले. या कार्यक्रमावेळी अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढारी

# विद्यापीठात मंथली इनोव्हेशन चॅलेंजची निर्मिती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्रातंर्गत स्थापन करण्यात आलेल्या एसयूके रिसर्च अॅन्ड डेव्हलपमेंट फाऊंडेशन



या सेक्शन-८ कंपनीतर्फे मंथली इनोव्हेशन चॅलेंज उपक्रमाची निर्मिती केली आहे. विद्यार्थी, संशोधक व नागरिकांना उद्भवणा-या विविध समस्यांवर नाविण्यपूर्ण उत्तरे सूचविण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. उपक्रमांतर्गत दर महिन्याला एक विषय देऊन त्यावर शोधलेले कल्पक पर्याय अथवा उत्तर विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in वेबसाईटवरील News and Event- Monthly Innovation Challenge- August २०२२ या लिंकवरील गुगल फॉर्ममध्ये भरावयाचे आहे. या महिन्याचे चॅलेंज 'फिनटेज बेस्ड आयडिया' या संकल्पनेवर असून त्याद्वारे सामान्य माणसाच्या समस्यांवर नवसंकल्पना सादर करण्याचे आवाहन नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी केले आहे.

पुढारी

# पोस्टर, निबंध स्पर्धांचे आयोजन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ गांधी अभ्यास केंद्राच्या वतीने भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव, शिवाजी विद्यापीठ हीरक महोत्सवानिमित्त 'महात्मा गांधी यांच्या स्वप्नातील भारत' या विषयावर २७ ते २९ सप्टेंबर या कालावधीत वक्तृत्व, निबंध व पोस्टर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.